भिवंडी वाहतूक उपविभाग हददीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.deptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/ ०२ /२०२६ दि. ०६/०१/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, भिवडी निजामपुरा महानगरपालिका कार्यक्षेत्रातील **भिवंडी** वाहतूक उपविभागाने हददीत दिनाक ०७ जानेवारी २०२६ रोजी भिवंडी शहरात महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने मा. मुख्यमंत्री सो. महाराष्ट्र राज्य यांची प्रचारसभा छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी होणार असुन याकरीता मा.मुख्यमत्री महाराष्ट्र राज्य यांचे सह मा. उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य तसेच मा.केंद्रिय राज्यमंत्री भारत सरकार असे उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे सदर परीसरात वाहतूक कोंडी होण्याची शक्यता असुन परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद –	**१)** बागे फिरदोस येथुन मौलाना आझाद उड्डाणपुलावरून (वंजारपट्टी ब्रीज) छत्रपती शिवाजी महाराज चौकाच्या दिशेने उतरणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **ब्रिजवर छत्रपती शिवाजी महाराज चौकाच्या दिशेच्या वळणावर 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची सर्व प्रकारची वाहने ही मौलाना आझाद उड्डाणपुलाखालुन (वंजारपट्टी ब्रीज) वंजारपट्टीनाका येथुन डावे वळण घेवुन इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**२)** स्व. राजीव गांधी उड्डाणपुल व स्व. बाळासाहेब ठाकरे उड्डाणपुल हा अतिमहत्वाच्या दौऱ्याचे वेळी काही वेळाकरीता पुर्णत: बंद करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदर उड्डाणपुलावरील वाहतुक ही पुर्णत: उड्डणपुलाखालुन दोन्ही बाजुने जातील.
व्ही.आय.पी. करीता पर्यायी मार्ग –	छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडून अतिमहत्वाच्या व्यक्तींच्या परतीच्या प्रवासावेळी पांजरापोळ चौकातुन दुभाजकाच्या उजव्या बाजुने मौलाना आझाद उड्डाणपुलावरून (वंजारपट्टी ब्रीज) छ. शिवाजी महाराज चौकाच्या दिशेने उतरणाऱ्या ब्रीजवरून विरूध्द दिशेने जावुन उजवे वळण घेवुन बागे फिरदोस येथुन स्व. राजीव गांधी उड्डाणपुलावर जातील.

सदर अधिसूचना **दिनांक ०७/०१/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजेपासुन रात्रौ २०:०० वा. पावेतो** अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण.
मा. आयुक्त, भिवंडी निजामपुरा शहर महानगरपालिका, भिवंडी/बृहन्मुंबई
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–२/वि.शा. ठाणे.

प्रत कार्यवाहीसाठी :—
प्रादेशिक परिवहन अधिकारी भिवंडी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, भिवंडी
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, भिवंडी
नियंत्रण कक्ष अधिकारी, भिवंडी/ठाणे.

प्रत :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/— सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :— समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे
२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :— संबंधित सपोआ वाहतूक विभाग व पोलीस निरीक्षक, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.